# सापळा केस

दिनांक २०/०२/२०२०

**आरोपी खाजगी ईसम क्र.१) कृष्णकुमार गंगाधर सातपुते वय ५५ वर्षे व्यवसाय ग्रेडर (सॅम्पलर), नाफेड खरेदी विक्री संघ परभणी रा.गणेश पेठ,वसमत जि.हिंगोली आरोपी खाजगी ईसम क्र. २) उध्दव माधवराव शिंदे वय ३२ वर्षे व्यवसाय सहायक नाफेड खरेदी विक्री संघ परभणी रा. मांगणगाव ता.जि.परभणी यांनी २७००/– रू लाच स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथे दि. १८/०२/२०२० रोजी तक्रार दिली की, नमुद आरोपी क्र.१ यांनी तक्रारदार यांना त्यांचे शेत मालाची प्रतवारी करून माल खरेदी करून घेण्यासाठी कृष्णकुमार गंगाधर सातपुते वय ५५ वर्षे व्यवसाय ग्रेडर (सॅम्पलर) हे प्रति क्विंटल मला १००/–रू प्रमाणे असे एकुण ३०००/– लाचेची मागणी करीत आहेत. त्यांच्या विरूध्द कारवाई करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक २०/०२/२०२० रोजी तक्रारदार यांना त्यांचे शेत मालाची प्रतवारी करून माल खरेदी करून घेण्यासाठी कृष्णकुमार गंगाधर सातपुते वय ५५ वर्षे व्यवसाय ग्रेडर (सॅम्पलर) यांनी तडजोडीअंती २७००/–रू लाचेची मागणी करून पैसे घेवून येण्यास सांगीतले. त्यावरून सापळा कार्यवाही आजमाविण्यात आली असता आरोपी १) कृष्णकुमार गंगाधर सातपुते वय ५५ वर्षे व्यवसाय ग्रेडर (सॅम्पलर), नाफेड खरेदी विक्री संघ परभणी रा.गणेश पेठ,वसमत जि.हिंगोली यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांचें सहायक आरोपी क्र.०२) उध्दव माधवराव शिंदे वय ३२ वर्षे व्यवसाय सहायक नाफेड खरेदी विक्री संघ परभणी रा. मांगणगाव ता.जि.परभणी यांचे मार्फत तक्रारदार यांचेकडुन २७००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. त्यांचे विरूध्द पो.स्टे. ताडकळस येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्रीमती. कल्पना बारवकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती. अर्चना पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री. भरत केशवराव हुंबे, पोलीस निरीक्षक श्री. भुजंग विठ्ठलराव गोडबोले, पोलीस निरीक्षक श्री. अमोल कडु, पोह/हनुमंते, पोना/कटारे, पोना/कुलकर्णी, पोशि/शेख मुक्तार, पोह/शकील पोना/मुखीद, मपोशि/टेहरे, चापोह/चौधरी, अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७**

**टोल फ्री क्रमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक, ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड – ८८८८८४१९६५

श्रीमती. अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड – ९६६५४७९३३३

श्री. भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी – ७०२१००२११०

श्री. भुजंग गोडबोले, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी – ९०११६१२३४६

श्री. अमोल कडु, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. परभणी – ८०८७०७२९१९

Scanned by CamScanner